तरुण भारत
Nagpur Main | 2022-11-19 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# तंत्रज्ञान आणि परिवर्तन अधिक प्रासंगिक व्हावे

## सी. पी. गुरनानी यांचे आवाहन

### आयआयएम परिषदेचा थाटात शुभारंभ

◆ नागपूर, १८ नोव्हेंबर

माहिती तंत्रज्ञान, प्रक्रिया या दोहोंना नव्या काळानुरूप ढाळून परिवर्तन अधिक प्रासंगिक व्हावे या दृष्टीने विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी प्रयत्न करावे, असे आवाहन टेक महिंद्राचे सीईओ आणि नागपूर आयआयएमच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी यांनी केले.

नागपूर आयआयएम येथे आयोजित त्रिदिवसीय प्रीतमसिंग स्मृती तांत्रिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी इंडियन ऑईलचे संचालक रंजनकुमार महापात्रा, बिट्सचे संचालक डॉ. हरिवंश चतुर्वेदी, आयआयएम दिल्लीच्या डॉ. आशा भांडारकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना गुरनानी यांनी, सध्या अनेकांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी करावा असा सल्ला दिला. यावेळी रंजनकुमार महापात्रा यांनी, आधुनिक काळातील विद्यार्थ्यांना आणि नोकरदारांना उत्तम जीवनमानाची अपेक्षा आहे. त्यांना केवळ उत्पन्नाचे महत्त्व नाही. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करण्याची गरज असल्याचे सांगितले. हरिवंश चतुर्वेदी यांनी, आज देशभरात दिसणाऱ्या अनेक मोठ्या संस्थांची पायाभरणी प्रीतमसिंग यांनी केली असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी बोलताना डॉ. भीमराया मेत्री यांनी, आज अनेक संस्थांमध्ये कार्यरत उच्चाधिकाऱ्यांचे मार्गदर्शक म्हणून प्रीतमसिंग यांनी काम केले असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. सुब्रत कुमार यांनी केले. याप्रसंगी प्रा. शिवा खक्कर, आलोककुमार सिंग, रामापापी रेड्डी आदी मान्यवर उपस्थित होते. ◄(तभा वृत्तसेवा)



दीपप्रज्वलन करताना सी. पी. गुरनानी. सोबत डॉ. भीमराया मेत्री, डॉ. आशा भांडारकर व इतर

Powered by iDocuments